दै. प्रजावाणी दि. 21/01/2024

# चिमुकलीवर अत्याचार व खून करणारा आरोपी जेरबंद

## ३१ तारखेपर्यंत पोलीस कोठडी

नांदेड,दि.२०: मुदखेड तालुक्यातील रोही पिंपळगाव येथील सहा वर्षीय बालिकेचे अपहरण करून अमानुषपणे खून करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात पोलिसांना अखेर यश आले. दरम्यान आरोपी हा गावातीलच निघाला असून, सदर गुन्ह्यात आणखी काही व्यक्तींची माहिती प्राप्त झाली असली तरी ठोस पुरावे प्राप्त झाल्यानंतर कारवाई केली जाईल. गंभीर स्वरूपाचा असलेल्या या गुन्ह्याचा तपास अतिशय बारकाईने आणि तांत्रिक पद्धतीने करण्यात येऊन आरोपीला अटक केली आहे तसेच गुन्ह्याची क्रुरता लक्षात घेता गुन्हेगाराला जास्तीत जास्त शिक्षा होईल, यासाठी प्रयत्न केले जाणारा असून, सदरचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविला जाईल, अशी माहिती पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

१४ जानेवारी मकरसंक्रात सणाच्या दिवशी मुदखेड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये रोही पिंपळगावातील एका सहा वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली होती. क्रुरतेची सीमा गाठणाऱ्या सदर घटनेमुळे सर्वत्र संताप आणि रोष व्यक्त केला जात होता. या गुन्ह्यातील आरोपींना तत्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी विविध संघटना, राजकीय स्तरावर तसेच सर्वसामान्य नागरिकांतून आंदोलने, निदर्शने केली जात होती. एकीकडे सामाजिक दबाव तर दुसरीकडे आरोपींच्या शोधासाठी कुठेही धागेदोरे मिळत नसल्याने पोलीस दलाची झोप उडाली होती. रोही पिंपळगावच्या पंचक्रोशीत यापूर्वी भांडण तंटे झालेले असले तरी एवढी अमानवीय घटना कधी घडलेली नसल्याने आरोपी कोण असावेत, किती असतील, त्यांचा हेतू काय होता, कोणत्या वाहनावर आले होते, यासह अनेक प्रश्न निर्माण झाले होते तर आरोपींचे चेहरे उघड करणे हे पोलिसांसमोर आव्हान ठरले होते. यासाठी पोलीस यंत्रणा गावामध्ये गेल्या सहा दिवसांपासून तळ ठोकूण होती.

मुलगी मिसिंग झाल्याची तक्रार मुदखेड पोलीस स्थानकात दाखल झाल्यानंतर पोलिसांनी गाव पातळीवर तसेच परिसरातील ओढे, नाले, विहिरी, उसाचे फड, खड्डे तसेच झाडाझुडपात जाऊन पाहणी केली. परंतु, तिचा शोध लागला नाही. अखेर १५ तारखेला तिचे प्रेत गावापासून दहा-बारा किलोमीटर अंतरावर आढळून आले. अतिशय निर्दयी आणि क्रुरतेने अत्याचार करून खून करण्यात आल्याने या संवेदनशील गुन्ह्याचा तपास करून आरोपीला जेरबंद करणे पोलिसांसमोर आव्हान होते. गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेऊन विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. शशिकांत महावरकर पोलीस, अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी घटनास्थळी भेट देऊन त्यांच्या आदेशाने अपोअ खंडेराय धरणे, डीवायएसपी सुशीलकुमार नायक, पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सपोनि चंद्रकांत पवार यांचे वेगवेगळे सहा पथक बनवण्यात आले.



### शेंगोळ्याचे दाखविले अमिष.

आरोपीने पिडितेला शेंगोळे खायला दिले. त्यानंतर तिचे अपहरण करून खून केल्याची कबुली त्याने पोलिसांसमोर दिली. आरोपीचे घर पीडितेच्या घरापासून काही अंतरावर आहे. तो जाता-येता तिला गोळ्या, बिस्किट देत असे. यामुळे शेंगोळे दिल्यानंतर आजूबाजूला कोणी नसल्याचे पाहून अपहरण केल्यानंतर निर्घृणपणे खून केल्याचे सांगितले जाते. यानंतर पोलिसांनी श्वानपथकाला गावात पाचारण करण्यात आले.

### गावकऱ्यांची मोठी मदत झाली

गुन्हा घडल्यानंतर पाच-सहा दिवस आरोपी संबंधी काहीच हाती लागत नव्हते. पोलीस यंत्रणा पहिल्या दिवसापासून तळ ठोकून होती. काही झाले तरी गुन्हा उघडकीस आणायचाच हे आमच्यासमोर ध्येय होते. एकीकडे आंदोलने, मोर्चे, निवेदने सुरू असताना काही राजकीय संघटनेसोबत गावकरी प्रत्यक्ष भेटून धीर देत होते. पोलिसांवरच विश्वास व्यक्त करत होते. लोकांनी मदत केल्यामुळेच आम्ही तपासावर लक्ष केंद्रित करू शकलो. त्यामुळेच आरोपीला पकडण्यात यश आले. या सर्व गावकऱ्यांचे व नागरिकांचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे यांनी आभार मानले.

दरम्यान गावात आणि इतर ठिकाणी सीसीटीव्ही नसल्याने दूरदूर पर्यंतचे फुटेज तपासण्यात आले. त्या कालावधीत किती वाहने गेली, कोणती वाहने गेली याचा तपास केला. परंतु, हाती काही लागले नाही. अनेक गुन्हेगारांची यादी काढून त्यांच्याही चौकशा करण्यात आल्या. गावाच्या आजूबाजूला सुरू असलेल्या बांधकामावर असलेले कामगार आणि काम सोडून गेलेल्या कामगारांची चौकशी करण्यात आली. गावातील युवकांची संख्या किती, त्यातील कितीजण मोबाईल वापरतात, काय पाहतात,

पान २ वर

### पोलिसांचे एकत्रित मेहनतीचे फळ...

सदरची दुर्दैवी घटना घडल्यानंतर दररोज पोलीस यंत्रणाही हादरुन गेली. रात्री तीन-चार वाजेपर्यंत तपास करुनही धागेदोरे मिळत नव्हते. पोलिसांनी 'हयुमन इंटिलीजन्स'चा वापर करुन घराघरातून तपास सुरु केला. गावात कोणती कुजबुज चालू आहे. शेतात, आखाड्यावर कोण काय बोलत आहेत, कुणाची दिनचर्चा बदलली आहे का?, यासह अन्य काही बाबी जवळपास ५ कि. मी. परिसरातून काढल्या जात होत्या. एखांद्या तरुणाची किंवा व्यक्तीची चौकशीच्या नावाखाली सामाजिक हाणी पोचणार नाही याची काटेकोरपणे काळजी घेण्यात येत होती. अखेर एका आरोपीवर संशय बळावल्याने गेल्या दोन-तीन दिवसांपासून त्याच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येत होते. अखेर तो आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकला. हे सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित मेहनतीचे फळ असल्याची चर्चा होत आहे.